Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

Original Article

महाराष्ट्रातील जातपंचायत व महिलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास

Supriya Mahendra Gaikwad[1] Dr. Bhagwan Lokhande[2]
[1]Dept. of Civics and Political Science, Mumbai University.
[2] gide द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा जि.रायगड
Email: Supriyamai02@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-171026
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 10(I)
Pp. 129-131
October 2025

Submitted: 20 Sept. 2025
Revised: 30 Sept. 2025
Accepted: 15 Oct. 2025
Published: 31 Oct. 2025

Abstract

जातपंचायत ही संविधान विरोधी आणि वंशपरंपरेने चालत आलेली समांतर न्यायव्यवस्था आहे. हि बाब चिंतनीय आहेच परंतु या अघोरी व्यवस्थांना लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येणाऱ्या उच्चविद्याविभूषित व्यक्तींकडूनही जाहीरपणे समर्थन मिळते हे अधिक चिंताजनक आहे. मुळातच जातपंचायतीमध्ये जातबांधवांना सुद्धा पंच होण्याचा अधिकार नसल्यामुळे स्त्रियांना तेथे स्थान मिळणे हे अशक्यच आहे. जातपंचायती जन्मापासून ते मरणापर्यंत जेवढेही महत्वाचे कार्य असतील त्यावर नियंत्रण आणि दबाव आणण्याचे काम करीत असते. या संशोधनाचा मुख्य उद्देश जातपंचायत निर्मुलनाकरिता महिलांमध्ये सामाजिक परिवर्तन, त्यांच्यावरील होणारे सामाजिक अन्याय व अत्याचार, महिलांच्या अधिकारांचा प्रसार आणि समाजातील लैंगिक असमानता यांविषयी उपाययोजना सुचविण्यासाठी या संशोधन विषयाची निवड करणे मला गरजेचे वाटते. संशोधन करीत असताना मला असे दिसून आले की, इतर जातींच्या तुलनेत सर्वाधिक अत्याचार हा महाराष्ट्रातील भटके विमुक्त समाजातील महिलांवर त्यांच्या जातपंचायतीमुळे जास्त प्रमाणात होत असतो. अघोरी प्रथा परंपरेच्या नावाखाली त्यांना बहिष्कृत करणे, कौमार्य परीक्षा, गोळ्याची परीक्षा, कर्ज फेडले नाही तर बायकोला धाडण्याची शिक्षा, योनीमार्गात मिरचीची पूड कोंबणारी शिक्षा, उकळत्या तेलात हात घालण्याची परीक्षा तसेच थुंकी चाटून माफी मागायला लावणे अशा क्लिष्ट आणि माणूसपणाला काळिमा फासणाऱ्या निर्णय पद्धती अशा प्रत्येक जातीच्या जातपंचायती या संविधान विरोधी व्यवहार करताना दिसून येतात.

'महाराष्ट्रातील जातपंचायत व महिलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाची मांडणी सामाजिक शास्त्रांमध्ये वापरण्यात येणाऱ्या ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींवर अवलंबून आहे. तसेच या ठिकाणी गुणात्मक आणि संख्यात्मक या संमिश्र पद्धतींचा उपयोग करण्यात आला आहे. संशोधन अध्ययना संबंधी स्वतःची तथ्ये गोळा करून महाराष्ट्रातील रायगड, नाशिक, पुणे, आणि औरंगाबाद या ०४ जिल्ह्यांतील घटनेशी संबंधित असणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या महिलांशी संपर्क साधून तसेच पंचायत सदस्यांकडून माहिती संकलित केली. निष्कर्ष दर्शवते की, महिलांचा सहभाग सुधारला जात असला तरीही जातपंचायती महिलांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सहभाग मर्यादित करतात. त्याचप्रमाणे हे संशोधन महिलांच्या सक्षमीकरण धोरणांसाठी, महिलांवर परंपरागत लादलेली क्रूर प्रथा, बंधणे व शोषण थांबविण्यासाठी तसेच न्यायव्यवस्थेला आव्हानं देणारी जातपंचायत व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी उपयोगी ठरते.

Keywords: जातपंचायत, महाराष्ट्रातील सामाजिक न्याय, महिला सहभाग, महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा- २०१६, लैंगिक समानता, संविधानिक मूल्य, भटके विमुक्त जाती, पारंपारिक संस्था.

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
OPEN ACCESS

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Supriya Mahendra Gaikwad, Dept. of Civics and Political Science, Mumbai University.

How to cite this article:
Supriya Mahendra Gaikwad, Bhagwan Lokhande. (2025). ***महाराष्ट्रातील जातपंचायत व महिलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास***, Journal of Research & Development, 17(10(I)), 129-131.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

Introduction:

एके काळी धार्मिक चालीरीती, रूढी, परंपरा यांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी त्या त्या धर्म आणि जाती- पोटजाती अंतर्गत काही कारभारी मंडळी कार्यभार सांभाळत होत्या. परंतु पुढे जाऊन याच मार्गदर्शनाचे आदेशात रुपांतर होऊन यामधूनच जातपंचायतीचा जन्म झाला. जातपंचायती प्रामुख्याने सामाजिक विवादाचे निवारण, जमिनीवरील विवाद, विवाह व सांस्कृतिक नियमांचे पालन करण्यासाठी कार्यरत आहे. मुळात जातपंचायतीची निवड हि वंश परंपरागत असल्यामुळे इतर जात बंधावाप्रमाणे स्त्रियांना सुद्धा यामध्ये स्थान नाकारले जाते. सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कारणांमुळे महिलांची भूमिका अनेकदा अप्रत्यक्ष राहते. आधुनिक काळात महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांचा सामाजिक आणि राजकीय सहभाग वाढविणे महत्वाचे आहे.

भारताने प्रजासत्ताक गणराज्याचा स्विकार करून ७५ वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही संविधान वादाची मूळ अधिक घट्ट होण्याऐवजी जातपंचायती सारख्या समांतर न्यायव्यवस्था आजही जनमाणसांवर प्रभाव गाजवताना दिसतात. संविधानिक मूल्य आणि संविधानिक व्यवस्था यांना जी अधिमान्यता मिळणे गरजेचे आहे ती अधिमान्यता देशभर खापपंचायत, गावकी, भावकी अशा विविध नावांनी समांतर न्यायव्यवस्था दिवसा ढवळ्या मानवी हक्कांचा, मानवी मुल्यांचा आणि लोकशाही तत्वांचा खून करताना दिसतात. महाराष्ट्रामध्ये जातपंचायतीचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात असले तरीही साधारणतः ३०० पेक्षा अधिक खाप पंचायती या हरियाना, पंजाब, मध्य प्रदेश व राजस्थान या उत्तरेकडील राज्यांमध्ये कार्यरत आहेत. या सर्व खाप पंचायतींची सर्वोच्च पंचायत म्हणजेच 'सर्वखाप पंचायत' ही होय. आणि या सर्व खाप पंचायतीमध्ये २५००० गावे समाविष्ट आहेत.

Objectives:

1) महाराष्ट्रातील महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग वाढविण्यासाठी उपयायोजना सुचविणे.
2) महिला प्रतिनिधित्वावर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अडथळयांचा अभ्यास करणे.
3) महाराष्ट्रातील जातपंचायतीमधील महिलांची भूमिका अभ्यासणे.
4) पारंपारिक जातपंचायात व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करणे.
5) महाराष्ट्रातील जातपंचायतींचा राजकीय नेतृत्वावरील प्रभाव अभ्यासणे.
6) ऑनर किलिंग सारख्या घटनांची कारणमीमांसा करणे.

Data And Methodology:

Primary Data:

- संशोधन अध्ययना संबंधी स्वतःच तथ्ये गोळा करून सबंधित घटना व घटनेशी संबंधित असणाऱ्या पिडीत महिलांच्या मुलाखती घेतल्या.
- महाराष्ट्रातील जातपंचायत व महिलांची भूमिका जाणून घेण्यासाठी व त्यामागील सत्यता पडताळून पाहण्यासाठी गावकऱ्यांचे सर्वेक्षण केले.

Secondary Data:

- संशोधनासाठी सरकारी अहवाल, प्रकाशने, संदर्भ ग्रंथ नियतकालिके इत्यादींचा वापर केला आहे.
- त्याचप्रमाणे महिला आयोग, NGO रिपोर्ट्स, न्यायालयीन खटले व कायदेशीर कागदपत्रे यांच्या अभ्यासाच्या सहाय्याने माहिती गोळा केली गेली आहे.

Sampling:

महाराष्ट्रातील रायगड, नाशिक, पुणे, आणि औरंगाबाद या ०४ जिल्ह्यांतील घटनेशी संबंधित असणाऱ्या ३० पिडीत महिला यांच्याशी प्रत्यक्षरित्या आणि मोबाईलच्या माध्यमातून संपर्क साधला आहे. त्याचप्रमाणे या संशोधन विषयाशी निगडीत असणाऱ्या १० केस स्टडीजचा सुद्धा संशोधन करण्यात आले आहे.

Result And Discussion:

1) महिला सहभाग : जातपंचायतींचे निर्णय हे महिलांच्या स्वातंत्र्य व हक्कांवर प्रतिकूल परिणाम करत असल्यामुळे महिलांचा सरासरी सहभाग २०-२५% आहे.
2) सामाजिक अडथळे : पुरुषप्रधान संस्कृती, जातपंचायतीची परंपरागत निवड पद्धती आणि शिक्षणाचा अभाव यांमुळे महिलांना समाजामध्ये दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे.
3) आर्थिक अडथळे : आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे महिलांना पंचायत कार्यास वेळ देणे कठीण होते.
4) जात पंचायत विरोधी कायदा : महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम-२०१६ हा कायदा असूनही याची योग्य अमलबजावणी होत नसल्याने व जागरूकतेअभावी महिलांना न्याय मिळण्यात अडथळे येतात.
5) सकारात्मक बदल : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीने जातपंचायत विरोधी अनेक आंदोलने छेडलेली दिसून येतात. अशा सुसंवादातूनच या संघटनेने एकून १७ जातपंचायती बरखास्त केल्या गेल्या आहेत. आणि सहाजिकच यामुळे कित्येक महिलांची

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

परंपरेनुसार चालत आलेल्या कुप्रथांमधून सुटका झालेली आहे आणि समाजामध्ये त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे NGOs व महिला संघटनांचा सहभाग सुद्धा महिलांना मदत करण्यात महत्त्वाचा ठरतो.

Conclusions:

1) जातपंचायत ही महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेतील एक महत्त्वाची परंपरा मानली जाते. परंतु महिलांसाठी ती बहुतेकदा अन्यायकारक ठरते.
2) जातपंचायतींमुळे महिलांवर सामाजिक बंधने व अन्याय होताना दिसून येत असले तरीसुद्धा काही ठिकाणी महिलांचा सहभाग वाढत आहे व जागृती होत आहे.
3) महिलांनी शिक्षण, संघटन व कायदेशीर मार्गांनी आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.
4) सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतिक अडथळयांवर काम करून महिलांना सशक्त केले जाऊ शकते.

References:

1) माने लक्षमण (१९९७). 'विमुक्तायन' मेहता पब्लिशिंग हाउस प्रा.लि.
2) घांगरेकर सी. जी. (१९९९). 'आधुनिक राजकीय विश्लेषण' नागपूर, विद्या प्रकाशन.
3) कऱ्हाडे बी. एम. (२००७) 'शास्त्रीय संशोधन पद्धती' नागपूर, पिंपालापुरे कं. पब्लिशर्स.
4) चव्हाण रामनाथ (२००८) 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत आणि लोकजीवन' खंड ४, देशमुख आणि कं. पब्लिशर्स प्रा.लि.
5) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'एनिहीलेशन ऑफ कास्ट' महाराष्ट्र शासन.
6) जानकर महादेव (२००९). 'बदल आम्ही घडविणार' मुंबई, यशवंत नायक प्रकाशन.
7) दिक्षित दुर्गा (२००९). 'महाराष्ट्र संस्कृती कोश' डायमंड पब्लिकेशन, पुणे.
8) फाटक संगीता (२०१०). 'भारतीय समाजातील समस्या व वाद' डायमंड पब्लिकेशन, पुणे.
9) प्रा. परदेशी प्रतिमा (२०१३). 'हिंदू कोड बिल ते ऑनर किलिंग' दिग्नाग प्रकाशन.
10) चांदगुडे कृष्णा (२०२१). 'जात पंचायतींना मूठमाती' विवेक जागर प्रकाशन, पुणे.
11) घोळवे सोपान (२०२२). 'महाराष्ट्रातील वंजारी समाजाचे राजकारण' नवरंग ग्राफिक्स, पुणे.
12) देशपांडे एस. (२०१५). 'वूमेन एंड पंचायतीराज इन इंडिया: अ स्टडी ऑफ महाराष्ट्रा'. साजे पब्लिकेशन, न्यू दिल्ली.